REGISTERED No. B. 3434




# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २२ मे १९४६ अंक २१

## —: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २



















पुणें चीफ एजंटस:—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक पुणें,









## विविध माहिती

**८० कोटि लोकांची उपासमार**—जागतिक अन्नतुटवड्याच्या परिस्थितीस तोंड देण्याचे कामीं रशियानें अमेरिका व इंग्लंड ह्यांचेशीं सहकार्य करावें अशी प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनी ज. स्टॅलिन ह्यांस विनंति केली होती, परंतु रशियानें आपल्या योजना अगोदरच आंखल्या असल्यामुळें आतां विनंति मान्य करणें शक्य होणार नाहीं असें त्या विनंतीस उत्तर मिळालें. रशियानें जर्मनीचा सुपीक प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला आहे आणि मांचुरियांतील बराच मोठा धान्याचा साठाहि त्यानें हलविला आहे. ब्रिटिश, अमेरिकन, कॅनेडियन, ऑस्ट्रेलियन वगैरे देशांतील लोकांस अजून २,९०० कॅलरी मिळत आहेत, त्यांत घट केली तर पुष्कळच तूट भरून येईल, असें मि. हूवर ह्यांनीं सांगितलें आहे. जगाच्या लोकसंख्येच्या एक तृतीयांशास म्हणजे सुमारें ८० कोटि लोकांस उपासमारीनें पछाडलेलें आहे.

**अलीगड येथें साबणाचा कारखाना**—मुंबईची टाटा ऑइलमिल्स लि. अलीगड येथें साबणाचा कारखाना उघडणार आहे. कंपनीच्या सध्याच्या दोन कारखान्यांत जे साबण आज तयार होतात, त्यांचेंच उत्पादन ह्या नव्या कारखान्यांत केलें जाईल.

**टेलिफोन्सचा तुटवडा**—टेलिफोन्सचा तुटवडा आणखी दोन वर्षें तरी नाहींसा होणार नाहीं, असें समजतें.

**खेडेगांवांस ज्यास्त राकेल मिळणार**—खेडेगांवांस ज्यास्त केरोसिन देतां यावें ह्यासाठी हिंदुस्थान सरकारने खटपट करून तें अधिक प्रमाणांत आयात होण्याची व्यवस्था केली आहे.

**मुंबई शहरांतील कुत्रीं**—मुंबई शहरांत कुत्रें बाळगावयाचें असल्यास, त्यावर दरसाल ५ रु. पट्टी पडते. लायसेन्स पट्टे नसलेले कुत्रे पकडून ते तीन दिवस ठेवण्यांत येतात. त्या अवधींत मालकानें आपला कुत्रा नेला नाहीं तर कुत्रे ठार करण्यांत येतात. चांगल्या कुत्र्यांचा लिलांव पुकारण्यांत येतो.

**स्वित्सर्लंडचें औद्योगिक नेतृत्व**:—स्वित्सरलंडमध्यें तेल, कोळसा, कच्चा माल इत्यादींचा अभाव असतांहि तेथील लोक हुशार आणि कल्पक असल्याकारणानें त्यांनीं उद्योगधंद्यांत पुढारीपण मिळविलेलें आहे. नव्या पेटंट्सचें वार्षिक प्रमाण अमेरिकेंत दर १० लक्ष लोकसंख्येशीं ३३० पडतें, तर स्वित्सलंडमध्यें तें ९३० आहे. दरमाणशीं संपत्तीचें अमेरिकेंत प्रमाण २,०९८ डॉलर्स आहे, स्वित्सरलंडमध्यें तें ३,१२६ डॉलर्स इतकें आहे. लहानशा स्विस राष्ट्रास ही परिस्थिति भूषणावह आहे.

**५० काड्यांच्या आगपेटीस २ पैसे**—१ ऑगस्टनंतर आगपेटांच्या कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या आगपेट्या २ पैशांस विकल्या जातील. प्रत्येक आगपेटींत ५० काड्या असतील.

**अमेरिकेजवळील सोनें**—जगांतील सोन्याच्या एकूण सांठ्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक सांठा अमेरिकेजवळ आहे, असें खालील आंकडे दर्शवितात:—

( १ औंसास ३५ डॉलर्स, ह्या हिशेबानें एकूण लक्ष डॉलर्स )

| | | जून | | १९४१ अखेर ते |
|---|---|---|---|---|
| | १९२८ | १९४१ | १९४५ | जून १९४५ बद्दल |
| अमेरिका | ६५ | २२७ | २०२ | — २५ |
| इतर देश | १०८ | १०८ | १६४ | — ५६ |
| एकूण | १७३ | ३५५ | ३६६ | — ३१ |
| अमेरिकेचा हिस्सा | ३८% | ६८% | ५५% | |

**ब्रह्मदेशांतील चलन व्यवस्था**—रिझर्व्ह बँकेकडे १९३७ सालापासून ब्रह्मदेशाच्या चलनाची व्यवस्था होती. त्या देशांतील परिस्थिति अद्याप पूर्ववत् झाली नसल्याकारणानें बँकेस आपलें काम योग्य प्रकारें करणें शक्य होणार नाहीं. म्हणून तेथील चलनाच व्यवस्थेची जबाबदारी रिझर्व्ह बँकेकडून काढून ब्रह्मदेशच्या गव्हर्नराकडे देण्यांत येत आहे. रिझर्व्ह बँक चलनाचे बाबत ब्रह्मी सरकारचे एजंट म्हणून व ब्रह्मी सरकारचे बँकर म्हणून काम करील.

त्यांची वेळीच काळजी घ्या!



परंपरा व आधुनिक वैद्यक या दोहोंचे दृष्टीनें उपयुक्त ठरलेलें, अंगकांति मृदु व तेजस्वी करणारें आणि हाडें मजबूत करून शक्ति व वजन वाढविणारें......

किरणांग तेल

अंगास चोळण्याचे पौष्टीक तेल

दि सूर्यकिरण फार्मसी लि.

SK 7 NINAD LTD.

महाराष्ट्र एजन्सी :

मेसर्स जयप्रकाश आणि कं.

२२५।४, सदाशिव, पुणें.

महाराष्ट्र शारदेचीं तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून

पैसा व ज्ञान मिळवा !

**श्रीमंत कसें व्हावें**—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा ! किं. १॥ रु.


**१०० टक्के यश**—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील ! किं. १॥ रु.

**काम आणि कामिनी**—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें ! अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.

**मृत्युलोकचा प्रवास**—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल ! किं. १ रु.—चारी पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ !

मेसर्स—विपट आणि मंडळी,

पो० कराड, जि. सातारा.



ओक शिवण्याचीं यंत्रें

फाफच्या तोडीचीं रोखीनें व हप्त्यानें मिळतील.

सोल डिस्ट्रिब्यूटर्स:—व्ही. आर. बापट, लकडीपूल नाका, लक्ष्मीरोड, पुणें

# १९४५ सालांतील कामगारविषयक कायदे

आज हिंदुस्थानांत इतर राष्ट्रांप्रमाणें कामगारविषयक प्रश्नांना महत्त्व आलेलें आहे. अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशांतून सुद्धां कामगारांचे मोठ्या प्रमाणावर संप चालू असून अशा वेळीं सरकारला त्यांत वेळोवेळीं लक्ष घालावेंच लागतें. त्यांतून हिंदुस्थानांत लवकरच या ना त्या स्वरूपाचें राष्ट्रीय मध्यवर्ती सरकार येणार हें निश्चित असल्यामुळें कामगारांच्या मागण्यांचा व जीविताचा प्रश्न यापुढें अधिकच महत्त्व पावणार आहे. त्या दृष्टीनें गेल्या वर्षांत झालेल्या मजुरविषयक कायद्यांचें विहंगमावलोकन करणें इष्ट आणि उपयुक्त आहे. १९४५ सालीं मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनी मिळून सहा कामगार विषयक कायदे मंजूर करून घेतलेले आहेत. यांपैकी पहिला महत्त्वाचा कायदा म्हणजे १९३४ सालच्या कारखान्याच्या कायद्यांत दुरुस्ती सुचविणारा मध्यवर्ती सरकारचा कायदा होय. १९३४ सालीं मंजूर झालेल्या मुख्य कायद्याच्या ३५ व्या कलमांत देण्यांत आलेल्या सवलतीमुळें बऱ्याच कामगारांना आठवड्याच्या अखेर विश्रांति मिळत नसे; ती मिळण्याची तरतूद आतां करण्यांत आली आहे. पण याही पेक्षां महत्त्वाची बाब म्हणजे कामगारांना दरवर्षी हक्काची पगारी रजा मिळण्याचा कायदेशीर हक्क आतां मान्य करण्यांत आलेला आहे. कारखान्यांत काम करणाऱ्या प्रत्येक कामगाराला प्रत्येक वर्षी ६ दिवसांची भर पगारी रजा मिळावी अशी शिफारस राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेनें १९३६ सालीं केलेली होती. १९३४ सालच्या मूळ कायद्यांत आतां जी दुरुस्ती करण्यांत आलेली आहे त्याअन्वयें वयांत आलेल्या प्रत्येक कामगाराला दर वर्षी १० दिवसांची व मुलांना १४ दिवसांची कायदेशीर हक्काची रजा मिळणार आहे. रजेच्या दिवसाच्या पगारापैकी निम्मा पगार कामगारांना रजेवर जाण्याच्या आधीं व निम्मा रजेहून परत आल्यावर मिळणार आहे. एकाद्या कामगाराला रजा रुजू होण्यापूर्वीच काढून टाकण्यांत आलें अगर रुजू झालेली रजा उपभोगण्यापूर्वीच तो काम सोडून गेला तर मालकाला रजेचा भरपगार द्यावा लागणार आहे.

मध्यवर्ती सरकारनें मंजूर केलेला दुसरा महत्वाचा कायदा खाणींत काम करणाऱ्या स्त्रियांना बाळंतपणाबद्दल मिळणाऱ्या सवलतींचा व सोयींचा होय. मूळ कायदा १९४१ सालचा असून त्यांत आतां दुरुस्ती करण्यांत आलेली आहे. दुरुस्त कायद्याप्रमाणें खाणींत काम करणाऱ्या स्त्रियांना बाळंतपणापूर्वी १० आठवडे व नंतर ६ आठवडे काम करण्यास बंदी केलेली आहे. बाळंतपणानंतरच्या सहा आठवड्यांनंतर कोणाही स्त्री-कामगाराला ४ तासांपेक्षां अधिक काम सांगतां येणार नाहीं. ही सवलत सहा आठवड्यांनंतरच्या १० आठवड्यापर्यंत व ज्या ठिकाणीं मुलांसाठी संगोपन-केंद्रें नसतील तेथेंच फक्त देण्यांत आली आहे. ज्यां ठिकाणीं संगोपन-केंद्राची सोय असेल त्या खाणींतून ४ तासांपेक्षा अधिक काम करून घेतां येईल; परंतु एका वेळीं ४ तासांपेक्षा अधिक मात्र सांगतां येणार नाहीं. बाळंतपणापूर्वीच्या व नंतरच्या वर ठरलेल्या अधिकृत काळांत बाळंतपणाचा भत्ता म्हणून दर आठवड्याला ६ रुपये मिळण्याचा स्त्री-कामगारांचा हक्क आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर स्त्री-कामगारांना भुईच्या पोटांत खाणींत काम करण्याची जी बंदी होती ती रद्द करण्यांत आली होती. ही बंदी १९४५ साल अखेर पुन्हा अंमलांत आणण्यांत आली आहे. खाणी कामगारांच्या मुलांसाठी शिशु-केंद्रें उघडावयास लावण्यासाठी १९२३ सालच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येऊन १९३४ सालच्या कारखान्याच्या कायद्याप्रमाणे नियम करण्याचा अधिकार मध्यवर्ती सरकारला देण्यांत आला आहे. १९३४ च्या कारखान्याच्या कायद्याप्रमाणें ५० पेक्षा अधिक स्त्री-कामगार काम करीत असलेल्या कारखान्यांना कामगारांच्या मुलांसाठी शिशु-संगोपन-केंद्रें ठेवावीं लागत. बहुतेक सर्व प्रांतांतून हा कायदा लागू करण्यांत आलेला होता. आतां हींच शिशु-संगोपन-केंद्रें स्थापन करण्याची जबाबदारी खाणींसंबंधानेंही लागू करण्यांत आली आहे. युद्ध अगर तत्संबंधी काम करतांना कामगारांना जर कांहीं दुखापत झाली तर १९४१ सालच्या वटहुकुमाप्रमाणें नुकसानभरपाई मिळत असे. परंतु "युद्धजन्य दुखापत" याची व्याख्या परेशी व्यापक नव्हती. मुंबईला १९४३ च्या एप्रिलमध्यें जो मोठा स्फोट झाला त्यांत जखमी झालेल्या लोकांना वरील वटहुकुमाप्रमाणें नुकसानभरपाई मिळण्याची शक्यता नव्हती. त्यावेळीं हिंदुस्थानांतून अतिपूर्वेकडे दारूगोळा मोठ्या प्रमाणावर पाठविण्यांत येत असे. मुंबईचा स्फोट झाल्यावर वटहुकुमांत दुरुस्ती करून स्फोटक पदार्थांच्या धक्क्यामुळें अगर आगीमुळें दुखापत झाल्यास कामगारांना नुकसानभरपाई मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली. तथापि ३१ ऑगस्ट १९४५ पासून युद्ध अधिकृतरीत्या थांबलेलें असल्यामुळें आतां या दुरुस्तीच्या कायद्याला फारसें महत्त्व राहिलेलें नाहीं हें उघडच आहे. प्रांतिक सरकारांपैकी बिहार सरकारनें बाळंतपणाबद्दल सवलती देणारा कायदा जुलै १९४५ मध्यें मंजूर केला आणि तो ऑक्टोबर १९४५ पासून अंमलांत आणण्यास सुरवात केली. या कायद्यान्वयें बाळंतपणानंतर ४ आठवडे व पुरे दिवस जाण्याच्या आधीं झालेल्या गर्भपातानंतर तीन आठवडे स्त्रियांना कारखान्यांत कामावर येण्याची बंदी करण्यांत आली आहे. बाळंतपणापूर्वी ४ आठवडे व नंतर चार आठवडे स्त्री-कामगाराने काम केल्यास तिने जें सरासरी वेतन दर दिवशीं मिळविलें असतें त्या दरानें तिला बाळंतपणाचा भत्ता देण्यांत यावयाचा आहे. याशिवाय १९३४ सालच्या मध्यवर्ती सरकारच्या कारखान्याच्या कायद्याप्रमाणें शिशु-संगोपन-केंद्रें उघडण्याचीही दुरुस्ती बिहार सरकारने केली आहे. बिहार सरकारच्या या कायद्यामुळें आसाम, बंगाल, मध्यप्रांत व वऱ्हाड, पंजाब व संयुक्तप्रांत येथील परिस्थिति या बाबतींत सारखी झालेली आहे. मुंबई सरकारनें १९३८ च्या मुंबईच्या औद्योगिक तंट्यासंबंधीच्या कायद्यांत दुरुस्ती केलेली आहे. या दुरुस्तीपूर्वी सरकारच्या मजूर अधिकाऱ्याला कारखान्यांच्या आवारांत सभा घेण्याचा अधिकार नव्हता. मग ज्याविषयीं सभा घ्यावयाची तो विषय सदर कायद्याच्या अंमलबजावणीशीं संबंधित असो अगर नसो. बहुधा गिरणीमालक सरकारी अधिकाऱ्यांना सभा घेण्याची परवानगी देत. परंतु परवानगी देणें अगर न देणें त्यांच्या अधिकारांतली बाब होती. नवीन दुरुस्तीप्रमाणें अशा सभा घेण्याचा अधिकार मजूर-अधिकाऱ्याला देण्यांत आला असून त्याबद्दलच्या नोटिसा गिरणीच्या आवारांत लावण्यासाठी मालकांना इशारा देण्यांत आलेला आहे. कांहीं हिंदी संस्थानांनींही अशाच स्वरूपाचे कांहीं कायदे मंजूर केले आहेत. युद्धकाळीं कामगारांच्या प्रश्नाला एरवींपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त होतें. मध्यवर्ति व प्रांतिक सरकारांनी केलेल्या या कायद्यांत त्या महत्त्वाचेंच प्रतिबिंब पडलेलें दिसून येतें. तथापि कामगारांच्या मागण्याही वाढलेल्या असल्यामुळें हिंदुस्थानांतील कामगारांचे प्रश्न सहज सुटण्यासारखे राहिलेले नाहींत.

## स्फुट विचार

### धान्य परिस्थितीसंबंधीं इषारा

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शेती व अन्न–समितीचे प्रमुख संचालक सर जॉन बॉईड ऑर यांनीं निरनिराळ्या सरकारांना व आंतरराष्ट्रीय संघटनांना एक पत्र लिहून वॉशिंग्टन येथें ता. २० मे रोजीं अन्नधान्य परिस्थितीचा विचार करण्याकरितां पाचारण केलें आहे. सर जॉन ऑर हे ब्रिटनमधील एक आहारतज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. आणखी चार–पांच वर्षें तरी जगांतील अन्नधान्य परिस्थिति आणीबाणीची रहाणार असल्याचें आपलें मत त्यांनी या पत्रांत व्यक्त केलें असून आंतरराष्ट्रीय योजनेशिवाय हा प्रश्न सुटणार नाहीं असें बजाविलें आहे. कष्टसाध्य रोगाला पथ्यहि तितकेंच कडक पाळावें लागतें ही गोष्ट लक्षांत घेऊन जगांतील सर्व अन्नधान्याचा साठा कडक नियंत्रणाखालीं ठेवण्याचा आग्रह ते वॉशिंग्टन येथील परिषदेंत करणार आहेत. उत्पन्न झालेल्या अन्नधान्याची वाटणी योग्य रीतीने करण्यासाठी एक नवीनच संघटना संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे उभारण्यांत यावी असा दुसराहि एक उपाय ते सुचविणार आहेत. जगांतील अन्नधान्याचें उत्पादन, वहातूक व विभागणी या बाबतींत सध्या अतिशय गोंधळाची व परिणामीं धोक्याची परिस्थिति आज दिसून येत आहे. अनराचे पहिले संचालक मि. लेहमन यांनी राजीनामा दिल्यावर दुसरे संचालक मि. ला गार्डीआ यांनीहि नुकतेच उद्वेगाचे उद्गार काढले. यावरून तज्ज्ञांचा सल्ला मानण्याचें जोंपर्यंत निरनिराळ्या देशांचीं सरकारें मनावर घेत नाहींत तोंपर्यंत नुसत्या कागदी संघटनांचा उपयोग होणार नाहीं हें उघड दिसतें. हिंदुस्थानांतील २५ प्रमुख अर्थशास्त्रज्ञांनीं हिंदी सरकारला चलन–विस्ताराला आळा घालण्याबद्दल असंदिग्ध इषारा दिला होता, पण त्यांचा सल्ला अरण्यरुदन ठरलें. त्याचप्रमाणें सर जॉन ऑर यांची स्थिति होणार काय ?

### ब्रिटनमध्यें कंपन्यांचें पेव

ब्रिटनमधील टोरी पक्षाची हुकमत संपून मजूर पक्षाची अमदानी सुरू झाल्यावर आर्थिक नियोजनाच्या चहात्यांना असें वाटलें कीं ब्रिटनमधील अर्थव्यवस्था लवकरच नियुक्त ( Planned ) पद्धतीची होईल. निदान तशा कार्यक्रमाची रूपरेषा तरी आंखली जाईल. मजूर मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यावर कोळसा, लोखंड, पोलादाचे कारखाने, वहातूक, बँक ऑफ इंग्लंड इत्यादींच्या राष्ट्रीयकरणाच्या योजना हळूहळू वाट चालूं लागल्या आहेत. तथापि निरनिराळ्या धंद्यांत किती भांडवल गुंतविलें जावें यासंबंधीं सर्वंकष योजना अद्याप तयार झालेली नाहीं. आर्थिक अरिष्टें टाळण्याचा एक उपाय म्हणून भांडवल गुंतविण्यावर नियंत्रण हा उपाय अर्थशास्त्रज्ञांकडून सुचविला जातो, व त्यासाठी भांडवल नियंत्रक समिति ( Investment Control Board ) असावी असेंहि सुचविलें जातें. चालू वर्षाच्या प्रारंभापासून इंग्लंडमध्यें ६५०० नव्या कंपन्या स्थापन झाल्या असून त्यांपैकी बहुतेक खाजगी आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. भागानें मर्यादित ( Public Limited ) अशा कंपन्यांवर खाजगी कंपन्यांपेक्षा कायदेशीर बंधनें अधिक असतात. अर्थातच बेताचें भांडवल घालून स्वतंत्र धंदा करणारे खाजगी कंपन्या काढतात. या नव्या कंपन्यांचें भांडवल १ हजार पौंडांपासून १० हजार पौंडांपर्यंत आहे. १९२० सालीं स्थापन झालेल्या कंपन्यांचें सरासरी भांडवल ३० हजार पौंडांवर होतें. छोट्या धंद्यांचें राष्ट्रीयकरण करण्याची शक्यता आज इंग्लंडमध्यें नाहीं व तसें करणें इष्टहि नाहीं. तथापि बड्या भांडवलाच्या कंपन्या व या छोट्या कंपन्या यांच्यांत गुंतलेल्या भांडवलाच्या प्रमाणावर एकंदर आर्थिक परिस्थिति अवलंबून असल्यानें छोट्या कंपन्या स्पर्धेत टिकणें न टिकणें बड्या कंपन्यांवरील नियंत्रणाच्या स्वरूपावर अवलंबून आहे.

### आर्थिक दृष्ट्याहि हिंदुस्थान अखंड पाहिजे

सिमला येथील वाटाघाटी अयशस्वी ठरल्यानंतर ब्रिटिश मंत्रिशिष्टांनीं आपली स्वतःची योजना प्रसिद्ध करून कोंडी फोडण्याचा यत्न केला आहे. राज्यघटना तयार करण्यासाठी घटना मंडळाची व्यवस्था व तात्कालिक योजना म्हणून हिंदुस्थान सरकार शक्य तितकें प्रातिनिधिक करणें, ह्या दोन गोष्टी मंत्रिशिष्टांनीं सुचविल्या आहेत. मंत्रिशिष्टांच्या योजनेच्या मध्यवर्ती सरकारच्या कक्षेंत लष्कर, परराष्ट्र खातें व वहातुक एवढ्या बाबी ठेवण्यांत आल्या आहेत; जकाती, चलन, इत्यादि बाबी त्या कक्षेच्या बाहेर आहेत, ही गोष्ट योग्य नाहीं, असें तज्ज्ञांचें मत प्रसिद्ध झालें आहे. लष्करी दृष्ट्या हिंदुस्थान अखंड व एक पाहिजे तसा तो आर्थिक दृष्ट्याहि हवा, असें आपलें मत सर चुनीलाल बी. मेहता ह्यांनीं व्यक्त केलें आहे. व्हाइसरॉयच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे पूर्वीचे सभासद, सर आर्देशीर दलाल ह्यांचाहि असाच अभिप्राय आहे. देशाचे तीन विभाग पडल्यास आर्थिक प्रगतीस आडकाठी येईल, कारण त्या विभागांतील मतभेदांचे दुष्परिणाम हिंदुस्थानास भोगावे लागतील. कित्येक संस्थानांचीं स्वतःचीं बंदरें आहेत, त्यामुळें परराष्ट्रीय व्यापाराचे बाबत तीं स्वायत्तता मागण्याचा मोठा संभव आहे.

### बेअरर प्रॉमिसरी नोटा काढण्यास बंदी

कांहीं हिंदी बँकांनीं बेअरर प्रॉमिसरी नोटा काढण्यास प्रारंभ केला होता. ठराविक काळानंतर त्या नोटांचे पैसे देण्यास नोट काढणारी बँक बांधलेली असते, आणि कोणीहि मनुष्य ह्या नोटा विकत घेऊं शकतो. मूळ खरेदीदाराचें नांव सुद्धां नोटांवर लिहिलेलें नसल्याकारणानें, नोटा काढणाऱ्या बँकेकडे कोणीहि नोटा दाखल करून पैसे घेऊं शकतो. फक्त रिझर्व्ह बँकेसच नोटा काढण्याचा अधिकार आहे, त्यावर ह्या पद्धतीमुळें आक्रमण होऊं लागलें. चलनपद्धतीच्या नियमनासहि तें बाधक होतें. ब्रिटिश हिंदुस्थानांतील बँकांस, अशा प्रकारच्या बेअरर प्रॉमिसरी नोटा काढण्यास प्रतिबंध करणारा एक नवा ऑर्डिनन्स गव्हर्नर जनरलनें काढला आहे. कांहीं बँका सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें किंवा ठेवींच्या पावत्या काढतात, त्या केवळ सहीनें त्यांचा मालक दुसऱ्याच्या नांवें करून देऊं शकतो. त्यांस प्रस्तुत ऑर्डिनन्स लागू नाहीं.

**नव्या गिरण्या कोठें काढाव्या ?**—हिंदी कापडाच्या धंद्याच्या वाढीसंबंधीं सूचना करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें १९४५ सालीं एक समिति नेमली होती. समितीचा अहवाल व त्यावरील सरकारचा अभिप्राय आतां प्रसिद्ध झाला आहे. यंत्रसामुग्रीच्या पुरवठ्याच्या अभावीं फारशी वाढ तात्काळ करतां येणार नाहीं, हें गृहीत धरूनच समितीनें शिफारसी केल्या आहेत. नव्या गिरण्या स्थापन व्हावयाच्या, त्या केंद्रीभूत न होतां सर्व हिंदुस्थानभर पसराव्यात, असें म्हणून त्यांची प्रांतवार वाटणीहि सुचविण्यांत आली आहे.

## कागद कारखाने

लेखक—दत्तात्रय त्रिंबक तळवळकर, बी. ए. एलएल. बी.,
दि रे पेपर मिल्स लि. मुंढवा, पुणें.

सध्याच्या यांत्रिक व ज्ञानाच्या विविध शास्त्रांतून झपाट्यानें प्रगत होत असलेल्या जगांत स्वतःच्या अत्यावश्यक व विविध उपयोगांमुळें कागद ही एक अत्यंत महत्त्वाची वस्तु झालेली आहे. त्यामुळें कागदाचा उद्योगधंदा हा एक प्रथम श्रेणींतील उद्योगधंदा समजला पाहिजे. कारण कागद नसेल तर सैन्य, आगगाड्या, बँका, शिक्षण इत्यादि सरकारचीं उपांगें किंबहुना सरकारच चालणें अशक्य होईल आणि आधुनिक संस्कृतीचे विशाल व गुंतागुंतीचे यंत्रें-सांधे निसळून खिळखिळे होतील. कागद नसला तर सध्यांच्या जगाचें काय होईल याची कल्पनाच करतां येणार नाहीं.

थोडक्यांत या धंद्याच्या इतिहासाचें अवलोकन करावयाचें झालें तर असें दिसेल कीं हा धंदा पौर्वात्य देशांतील होता. कागद तयार करण्यांचा शोध चीन देशांत लागला आणि छापण्याच्या कलेचा शोध, ज्ञानाची बहुविध प्रगति, शिक्षणाचा प्रसार, जाहिरातींचे व प्रचारतंत्राचे विविध प्रकार यामुळें कागदाची मागणी सतत झपाट्यानें वाढत आहे.

लहान प्रमाणावर कागद तयार करण्याचा धंदा हिंदुस्थानांत पूर्वीपासून आहे. थोड्या प्रमाणावर व आधुनिक पद्धतीनें कागद तयार करण्याची गिरणी बाली येथें "बाली मिल" या नांवानें निघाली. १८७९ मध्यें उत्तर हिंदुस्थानांत आणखी एक गिरणी निघाली. पण १८८२ मध्यें निघालेली तिसरी गिरणी ही "सार्वजनिक मंडळी" म्हणून नोंदविली गेली. या तीन गिरण्या व पुणें आणि ग्वाल्हेर येथील लहान प्रमाणावरील धंदे हेच हिंदुस्थानांतील कागदाच्या उद्योगधंद्यांतील पहिले धुरीण होत. गेल्या शतकांत या धंद्याचें महत्त्वहि कारखानदार वर्गाला कळलें नव्हतें. सन १९३५ मध्यें प्रथमतःच या धंद्यांतील कारखानदारांनीं संयुक्त व नेटानें असें संरक्षण सरकारकडे मागितलें.

या देशांत या उद्योगधंद्याची वाढ अत्यंत अल्प प्रमाणानें झाली असें खेदपूर्वक म्हणावें लागतें. १९४२-४३ सालीं या देशांत कागदाच्या गिरण्या फक्त १६ होत्या व त्यांतून १८२१००० हंड्रेडवेट कागद निर्माण झाला. खालील आकड्यांवरून या धंद्याची कशी हेळसांड होत आहे हें दिसून येईल. हेळसांड ही भांडवल, धंदेवाईकदृष्टि व सरकारी संरक्षण त्यांच्या अभावामुळेंच झाली असावी.

१९२८ ते १९३४ ...... ३ गिरण्या.
१९३५ ते १९३९ ...... ९ गिरण्या.
१९४० सालीं. ...... ११ गिरण्या.
१९४० ते १९४३ ...... १६ गिरण्या.

| | मालाचें उत्पादन | कागदाची आयात. |
|---|---|---|
| १९३७-३८-३९ | ११३०००० हंड्रेडवेट | ३३५३०० हं. |
| १९३९-४० | १४१६००० ,, | २७०१००० ,, |
| १९४०-४१ | १७५३००० ,, | २१०३००० ,, |
| १९४१-४२ | १८७१००० ,, | १३०८००० ,, |
| १९४२-४३ | १८२१००० ,, | ४२०००० ,, |

यावरून असें दिसून येईल कीं जर हा धंदा उत्तम रीतीनें चालविला गेला तर हिंदुस्थानची स्वतःची गरज तर भागेलच पण ती एक निर्यात उत्पन्नाची बाबही होऊं शकेल.

हिंदुस्थान हा स्वतःच्याच कच्चा मालांतून कागद तयार करूं शकेल. वाया जाणारा कागद, चिंध्या, कळक, गवत, कापसाचे धागे, गिरण्यांतील वाया जाणारें कापड अशा बऱ्याच गोष्टींतून हिंदुस्थानांत कागद तयार करतां येईल. हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश आहे आणि शेती आतां यांत्रिक पद्धतीनें होण्याचे मार्गावर आहे. अशा स्थितींत कागदास लागणारा कच्चा माल येथल्या येथें भरपूर मिळूं शकेल.

मग या धंद्याची प्रगति कां होत नाहीं? इतक्या थोड्या गिरण्या कां आहेत? सुरवातीस लागणारें भरपूर भांडवल व गुंतागुंतीची यांत्रिक रचना यामुळें हा धंदा स्थितप्राय दिसतो यांत शंका नाहींच. तथापि याशिवाय सरकार व जनता यांकडून मिळणारी मदत, खाजगी कारखानदारांचें सहकार्य, सरकारची संरक्षणक्षम धंदा म्हणून मान्यता यांच्या अभावीं यांतील तज्ञ कारखानदारांना उत्साह मिळून धंद्यांची वाढ झाली नाहीं हेंच खरें.

आतां जुनी व्यवस्था ही निःसंशय बदलत चालली आहे. अशा वेळीं हिंदुस्थान हा नुसताच कृषिप्रधान देश राहणें शक्य नाहीं. म्हणून नव्या दृष्टीस मान्यता देऊन ती योग्य रीतीनें संवर्धन करून प्रत्यक्षांत आणिली पाहिजे. काँग्रेस ही देश उद्योगप्रधान करण्याचें व त्यायोगें लाखों गोरगरिबांची उन्नति करण्याचें कंकण बांधून अधिकारांत आली आहे. अशा वेळीं हिंदुस्थानांत मिळणारा कच्चा माल पाहून कोणत्याही दृष्टीनें हिंदुस्थान उद्योगप्रवण होईल हें निर्ने पाहिलें पाहिजे. म्हणून मला असें सुचवावेसें वाटतें कीं, सध्याचे लोकप्रिय सरकारनें अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांना उत्तेजन दिलें पाहिजे. आपल्याच बळ असणारी निसर्गसंपत्ति व मनुष्यबळ यांचा योग्य उपयोग करून राष्ट्रीय बचत करणें व त्यायोगें जनहित साधणें हें लोकप्रिय सरकारांत अंतर्भूतच असतें.

ज्या मालाला या देशांत भरपूर मागणी आहे अशा मालाच्या उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांत पैसा गुंतविणें अगर अशा धंद्यांना कर्ज देणें यांत प्रांतिक सरकारनें आतां पूर्वीप्रमाणें कचरण्याचें कारण नाहीं. अशा तऱ्हेनें उद्योगधंदे वाढविण्यास या सरकारनें हातीं घेण्यास भरपूर वाव आहे. निदान जेथें शक्य आहे अशा ठिकाणीं हिंदुस्थाननें स्वतःच्या संपत्तीचा उपयोग करून घ्यावा व अशा गोष्टींना हिंदुस्थान पारखा राहूं नये असें धोरण आखणें केव्हांही इष्ट आहे.

पुष्कळ कारखानदार व कागदाचे धंद्यांतील तज्ञ आणखी कागदाच्या गिरण्या काढूं इच्छितात. त्यांना सरकारकडून व धनिक लोकांकडून आर्थिक मदत होणें आवश्यक आहे. अशा तऱ्हेच्या उद्योगधंद्यांना सर्वतोपरी मदत, संरक्षण वगैरे मिळणें आवश्यक आहे.

या लेखांतील मूळ उद्देश लक्षांत घेऊन हिंदुस्थानच्या प्रगतीस सध्याच्या लोकप्रिय काँग्रेस सरकारची मदत होईल अशी आशा आहे.

---

## हिंदी साखरेच्या उत्पादनांत घट

१९४५-४६ मधील साखरेचें उत्पादन बरेंच कमी झालेलें आहे. पावसाच्या अभावीं बऱ्याच ठिकाणचें पीक वाळून गेल्याचा हा परिणाम आहे. संयुक्तप्रांत, बिहार, पंजाब, सरहद्दप्रांत व हिंदी संस्थानें यांतील उत्पादन घटलें तरी मुंबई प्रांतांतील उत्पादन १९४३-४४ चे मानानें बरेंच ज्यास्त आहे. अन्नधान्याची लागवड वाढविणाऱ्या कायद्याच्या अंमलबजावणीमुळें मुंबई प्रांतांतील उत्पादन फारसें वाढूं शकलें नाहीं. मद्रास आणि बंगाल सरकारांनीं साखरेचें उत्पादन वाढविण्यास मुद्दाम प्रोत्साहन दिलें, तें खालील आकड्यांत दिसून येतें. गुळाची वाढलेली किंमत, वहातुकीच्या अडचणी, मजूर मिळण्याची पंचाईत, इत्यादि कारणांमुळेंहि हिंदी उत्पादनांत घट झाली आहे.

३१ मार्च अखेरचे आकडे : टन

| क्षेत्र | १९४३-४४ | १९४४-४५ | १९४५-४६ |
|---|---|---|---|
| संयुक्त प्रांत | ५,९६,८०४ | ५,१०,७३८ | ५,०४,६५५ |
| बिहार | २,०५,५६९ | १,६४,८७४ | १,७४,५६० |
| मुंबई | ५८,०४९ | ६४,३८८ | ६३,५३६ |
| मद्रास | ३०,४७२ | ३७,०५३ | ३९,५३९ |
| पंजाब | ८,७४७ | ७,९१२ | ७,३६१ |
| बंगाल | १०,९१३ | १०,८७५ | २०,५८६ |
| सरहद्दप्रांत | ५,००८ | ३,९८५ | २,९७१ |
| ओरिसा | १,६८८ | २,४७७ | २,१४६ |
| संस्थानें | १,०१,३४० | १,०३,१५३ | ८८,२७३ |
| एकूण | १०,१८,५९० | ९,०५,४५५ | ९,०३,६२७ |

## उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयकरण व त्यांतील गुंतवणूक

ले.:—श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम., पुणें ५.


आगामी हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक धोरणामध्यें विशिष्ट मूलग्राही महत्त्वाच्या धंद्यांचें राष्ट्रीयकरण ही एक महत्त्वाची बाब होणार हें ठरल्यासारखेंच आहे. तेव्हां आज ज्या उद्योगधंद्यांत आपण पैसे गुंतविले आहेत, त्यांचा विचार करतां आपल्या गुंतवणीचें भवितव्य काय होईल हें पाहाणें युक्त होईल. त्याचप्रमाणें सरकारनें सुरू केलेल्या उपक्रमांत खासगी गुंतवणुकीस कितपत वाव राहील ह्याचाहि विचार बोधप्रद होईल.

सध्यां चालू असलेल्या धंद्यांचें राष्ट्रीयकरण झालें तर ज्यांनीं त्यांत पैसे गुंतविले आहेत अशांचें नुकसान होण्याचा संभव नाहीं. बँक ऑफ इंग्लंडची मालकी सरकारकडे गेली परंतु भागीदारांना निश्चित व्याजाचा सरकारी स्टॉक मिळाला तो लक्ष्यांत घेतां भागांच्या चालू बाजारभावापेक्षां त्यांस जास्तच मोबदला मिळाला असें दिसून येतें. बँकेच्या मूळ भागीदारांजवळ तिचे शेअर्स असल्यास त्यांस वाढलेली संपूर्ण रक्कम मिळत आहे. ज्यांनीं सुरक्षितपणा व सुटणारें विवक्षित व्याज हीं पाहून मागाहून शेअर्स घेतले, त्यांस त्यांनीं गुंतविलेली रक्कम परत मिळत आहे व त्यांस पडावयाच्या व्याजांत फरक होत नाहीं. सध्याच्या मूलग्राही महत्त्वाच्या हिंदी उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयकरण करतेवेळीं हेंच धोरण अवलंबिण्यांत येईल असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. म्हणजे ह्यापुढें शेअरमध्यें रक्कम गुंतविणारा भागीदार हा सरकारी रोख्याचा मालक बनणार. ह्यापुढें एखाद्या विशिष्ट उद्योगधंद्याचे शेअर्स किंवा डिबेंचर्स घेण्याची त्याची भूमिका उरत नाहीं. स्वतःचे हातीं घेतलेले धंदे सरकार किती कार्यक्षमतेनें चालवितें ह्यावरच त्यास भिस्त टाकून त्यावर वार्षिक ठराविक डिव्हिडंडसाठी अवलंबून राहावें लागतें. कंपनीस मिळणाऱ्या वार्षिक नफ्याचे आकड्यांत होणारा बदल व त्या अनिश्चितपणामुळें निर्माण होणारी सट्टेबाजी ह्यांमुळें शेअरचा भाव दररोज वर खालीं जातो. त्याकारणानें शेअरमध्यें पैसे गुंतविणारा रोज एक प्रकारच्या काळजींत असतो. ही काळजी उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयकरणांत त्यास बाळगावी लागणार नाहीं.

सहाजिकच, स्टॉक एक्सचेंजमधील अवाढव्य उलाढाली व नफेबाजी ह्यांस वावच उरणार नाहीं. सट्टेवाल्यांना आपल्या नशीबाची परीक्षा पाहण्यासाठीं अन्य मार्गाचा अवलंब करावा लागेल. खासगी उपक्रमास प्रोत्साहन न मिळाल्याकारणानें राष्ट्रीय उत्पादनावर त्याचा प्रतिकूल परिणाम होईल, असें म्हटलेलें ऐकूं येतें. राष्ट्राची मालकी व खासगी मालकी ह्यांच्या फायद्या-तोट्याच्या वादांत येथें शिरण्याचें कारण नाहीं. कोणताहि धंदा चालविणारांस त्यांच्या कर्तृत्वास अनुसरून मोबदला मिळाला तर खासगी प्रयत्नांस प्रोत्साहन न मिळण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. देशांतील उद्योगधंद्यांच्या फलाची वाटणी जास्त समतोल होण्यामुळें होणारा सार्वजनिक फायदा फार मौल्यवान असा आहे. खाजगी व्यक्तींनी आंधळेपणाने धंदे काढल्यामुळें नुकसान होतें तें योजनापूर्ण उत्पादन केल्यास टळण्यासारखें आहे. त्यामुळें चलती-मंदीस व मधून मधून होणाऱ्या बेकारीस वावच उरणार नाहीं.

स्टॉक एक्सचेंजवर सध्यां अनेक कंपन्यांचे शेअर्स झळकतात, त्यांचे ऐवजीं एकटा सरकारी रोखाच दिसेल. सरकार एकाच ठराविक दराचे परंतु वेगवेगळया वेळीं परतफेडीचे निरनिराळे रोखे काढूं शकेल. परतफेडींची मुदत विवक्षित धंद्यांस किती मुदतीचें भांडवल पाहिजे ह्यावर अवलंबून राहील.

छत्रे यांचा
-कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालकः—एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. ३३८४९ ] मुंबई ४.




## ‘अर्थ’ ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार






वर्ग पुस्तकें बंद

इंडि. युना. मिल्स ३-५-४६ ते ३१-५-४६

# मुंबई शेअर बाजार

व्याज-वजा

+ स्वदेशी रु. २२ दि. १५-५-४६

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून ) इंडि. यु. ऑ. ०-१५-० दि. १०-६-४५

इंडि. यु. डि. ०-३-० दि. १०-६-४५

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १४।५।४६ | बुधवार १५।५।४६ | गुरुवार १६।५।४६ | शुक्रवार १७।५।४६ | सोमवार २०।५।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | आगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | ३०२१—४ | ३०३२—८ | ३०३५—० | ३०११—४ | |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५३६—० | ५३६—० | ५३५—० | ५३५—० | |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २५४३-१२ | २५३१—४ | २५३५—० | २५११—४ | |
| ७०२; ५६६ | १९—०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ९४०—० | ९३६—० | ९३२—० | ९२४—० | |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ८३९—० | ८१९—०+ | ८१८—० | ८१२—० | |
| ४४३-८; ३६० | ५-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ४९३—० | ४९२—० | ४९२—८ | ४८३—० | |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४३५—० | ४३२—० | ४३१—० | ४२५—० | —बाजार बंद— |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३९२—८ | ३९२—८ | ३८९—० | ३८७—० | |
| ३३७; २४३ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४३४—० | ४३१—८ | ४३१—८ | ४२७—८ | |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५—५ | ५—५ | ५—५ | ५-४-६ | |
| १७ १०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २२-१५-९ | २३—१ | २३—६ | २३—१ | |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | „ डिफर्डस् | १ | ४-६-० | ४-७-० | ४-७-६ | ४-७-० | |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ९३२—८ | ९३७—८ | ९४५—० | ९२५—० | |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २५३-१२ | २५४—८ | २५३—८ | २५३—४ | |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २९५—० | २९३—० | २९६—० | २९९—० | |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६५७—८ | ६५७—८ | ६५५—० | ६५७—८ | |
| ४३-७; ३०-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४५—३ | ४६—१ | ४८—२ | ४७-१४ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १०२—१३ | १०२—११ | १०२—११ | १०२—११ | |

सोमवार दि. २०-५-४६ ला लेखनिकांच्या हरताळानिमित्त बाजार बंद होता.

## अमेरिकेची एक्सपोर्ट-इंपोर्ट बँक

अमेरिकन मालाची निर्यात वाढविण्याच्या दृष्टीनें एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेची १९३४साली स्थापना झाली. अमेरिकेशीं व्यापारी संबंध असलेल्या कांहीं देशांतील अनिश्चित राजकीय व आर्थिक परिस्थितीचे सर्व दुष्परिणाम माल निर्गत करणारे, आयात करणारे, बँकर्स, इत्यादींस भोगावे लागूं नयेत ह्यासाठीं वरील संस्था निर्माण करण्यांत आली व तिनें कांहीं आर्थिक जबाब्दाऱ्या पत्करल्या. दीर्घमुदतीचीं कर्जें देऊन आणि प्रत्यक्ष उत्पादनास भांडवल पुरवून इंपोर्ट-एक्सपोर्ट बँकेनें अमेरिकेचा परराष्ट्रीय व्यापार वाढविण्यास सहाय केलें. १९४५ च्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँक कायद्यानें त्या बँकेच्या कार्याचा विस्तार पुष्कळच वाढविला. १९३४ ते १९४५ ह्या मुदतींत बँकेनें ४½ कोटि डॉलर्स नफा मिळविला. तिच्या येणें कर्जापैकीं फक्त १,७८,००० डॉलर्सचें कर्ज १९४५ अखेर वसूल होणेंचें राहिलें होतें. इतर व्यापारी बँकांशीं प्रस्तुत बँक स्पर्धा करीत नाहीं, उलट त्यांच्याशीं पूर्ण सहकार्यच करीत आली आहे.

तिसऱ्या वर्गाचा डबा—आगामी तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या डब्याचा एक नमुना बंगलोरच्या हिंदुस्थान एअरक्राफ्ट फॅक्टरीनें तयार केला आहे, तो रेल्वेच्या मध्यवर्ती सल्लागार मंडळास पसंत पडला आहे. तपशीलाचे बाबत मंडळानें कांहीं सुधारणा सुचविल्या आहेत.

## बेकरी, मॅक्रोनी, मसाले, कोको इत्यादि धंद्यांची पुनर्घटना

मुंबई सरकारनें प्रांतांतील उद्योगधंद्यांच्या पुनर्घटनेबाबत विचार करण्याकरतां अेक बिनसरकारी सभासदांची कमिटी नेमली असून सदर कमिटीनें निरनिराळ्या धंद्यांचें वर्गीकरण करून दुय्यम कमिट्या नेमल्या आहेत. ( १ ) बिस्किटें व बेकरी प्रॉडक्टस ( ब्रेड, केक्स, वगैरे ) ( २ ) निरनिराळ्या धान्यांचे पोहे, शेवया (मॅक्रोनी) व तत्सम पदार्थ, ( ३ ) मसाले, पापड-पापड्या व तत्सम पदार्थ ( ४ ) मिठाई ( पेपरमिंट, लेमन-ड्रॉप्स वगैरे) ( ५ ) कोको, चॉकोलेट व ( ६ ) काजूगर, या धंद्यांची पहाणी करून सदर धंद्यांच्या वाढीबद्दल निवेदन करण्याचें काम बिस्किट, कोको व चॉकोलेट कारखानदार आणी प्रेसिडेन्सी इं. बँकेचे चेअरमन श्री. रा.रा.साठे ह्यांचेकडे सोपविलें आहे. तरी वरील धंद्यांशीं संबंध असलेल्या व नवीन धंदे काढूं इच्छिणाऱ्या इसमांनी आपल्या धंद्यासंबंधाच्या अडचणी २५ मेच्या आंत त्यांचेकडे कळवाव्या.


## बार्शी सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि.

### —: नोटीस :—

बँकेच्या सर्व सभासदांस कळविण्यांत येतें कीं बँकेची विशेष साधारण सभा दिनांक ९ जून १९४६ रोजीं दुपारीं ४ वाजतां साने मेमोरियल हॉलमध्यें बँकेच्या नोटिस बोर्डावर प्रसिद्ध केलेल्या विषयांचा विचार करण्याकरतां भरणार आहे; तरी सर्व सभासदांनीं वेळेवर उपस्थित राहाण्याची कृपा करावी. कळावें.

बार्शी } बोर्डाच्या हुकुमावरून
ता. ९।५।४६ } र. प. पटवर्धन
मॅनेजर

## उद्बोधक उद्गार

### पैसेवाल्यांनीं घेतलेले चालू धंदे : नव्या कंपन्यांच्या शेअर्समधील गुंतवणूक

कित्येक भांडवलवाले लोक बऱ्या-वाईट मार्गानें कमवलेल्या पैशांच्या बळावर चालू कारखाने वाटेल त्या किंमतीस विकत घेत आहेत. ह्या प्रवृत्तीस उद्देशून मुंबई स्टॉक एक्सचेंजचे अध्यक्ष श्री. के. आर. पी. श्रॉफ, हे म्हणतात:– “ कित्येक मोठ्या औद्योगिक कारखान्यांची मालकी ह्या लोकांकडे गेली आहे. त्यामुळें सुप्रस्थापित नामवंत आणि अनुभवी अशा किती तरी फर्म्स नाहींशा झाल्या आहेत. चालू धंद्यावर ताबा मिळविणें सोपें आहे परंतु तो नीट चालविणें सोपें नाहीं. अडचणीचे प्रसंगांतून उद्योगधंदा तारून नेण्यास केवळ पैशाचें पाठबळ पुरत नाहीं. व्यवस्थेचा अनुभव, कुशलता हीं अत्यंत उच्च दर्जाचीं असावीं लागतात. नेकी, उच्च ध्येय, निष्ठा, पिढीजातपणा, उच्च नांवाचा अभिमान, हीं सर्व आवश्यक आहेत. युद्धकाळांत ज्यांनीं पुष्कळ पैसा कमावला आहे, त्यांचेपाशीं हे सर्व गुण असतीलच असें नाहीं. तेव्हा भागीदारांचें हित व देशांतील सर्वसाधारण औद्योगिक प्रगति ह्यांचें दृष्टीने ह्या घटनेकडे काळजीपूर्वक लक्ष्य दिलें पाहिजे.

“ चालू कंपन्यांच्या किंमती इतक्या चढल्या आहेत कीं त्यांचे शेअर्स घेण्यापूर्वी लोकांनीं त्याचा शांतपणें विचार करणें आवश्यक झालें आहे. नवीन कंपन्यांच्या शेअर्समध्यें पैसे गुंतवणारांनीहि नीट चौकशी केली पाहिजे. लोक प्रॉस्पेक्टससुद्धां पुरा वाचीत नाहींत. शेअर्स अंडरराइट केले असल्याचें वाचून ते अर्ज करण्याची घाई करतात आणि शेअर्स सर्व खपून जातात. तेव्हां वाढाव्यानेंहि त्या शेअर्सची खरेदी सुरू होते, आणि कंपनीचे उत्पादक व त्यांचे मित्र चांगला फायदा मिळवितात. वस्तुस्थिति समजूं लागली कीं शेअर्सची किंमत घसरून ती मूळ किंमतीचेहि खालीं जाते! अशा प्रकारें शेअर्स घेणारांना सावधगिरीची सूचना देणें अत्यावश्यक आहे. शेअर्सची किंमतीची अधिकृत माहिती मिळूं लागेपर्यंत वाट पाहाणें हें सर्वांत उत्तम. बाजाराची पुढील प्रवृति विचारांत घेतां किंमती चढल्या–उतरल्या तरी अखेर त्या उतरणीसच लागतील.”

### नग न मोजतां तयार केलेली रेल्वे रसीद गैरकायदा

व्यापाऱ्यांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा एक निकाल सोलापूर जॉईंट सिव्हिल कोर्टानें नुकताच दिला आहे. तो व्यापाऱ्यांना कळावा म्हणून सोलापूर येथील वकील, श्री. शं. ना. आंबेकर, ह्यांनीं महाराष्ट्र चेंबरच्या मासिक मुखपत्रांत प्रसिद्ध केला आहे.

“वहातुकीसाठी माल ताब्यांत घेतांना व रेल्वे रसिद तयार करण्यापूर्वी सर्व नग मोजून घ्यावेत असे रेल्वेचे नियम आहेत. कारकुनाच्या आळशीपणामुळें किंवा त्यांना जास्त काम पडतें त्यामुळें ते कित्येदां नग न मोजतां S/o (Said to Contain) × × ×bags अशी रेल्वे रसीद देतात. शेवटीं डिलिव्हरी घेतांना कांहीं नग कमी आल्यास ‘ रेल्वेने नग मोजले नव्हते सबब कमी मिळालेल्या नगांची रेल्वेवर जबाबदारी नाहीं ’ असें रेल्वे कंपन्या उत्तर देतात. रेल्वे नोकरांनीं स्वतःचें कर्तव्य करावयाचें नाहीं मात्र त्याचें प्रायश्चित्त व्यापाऱ्यांच्या माथीं मारावयाचें असा हा अन्याय कित्येक वर्षें चालू आहे.

“अशाच एका S/o रेल्वे रसिदीच्या मालापैकीं नग कमी मिळाले म्हणून सोलापूरच्या शेट गौतमचंद माणिकचंद या व्यापाऱ्यानें ई. आय. व जी. आय. पी. रेल्वेवर दावा केला होता. त्या कामीं S/o रेल्वे रसीद गैरकायदा ठरवून वादीस कोर्टानें नुकसानभरपाई दिली.”


शांतीलाल भगवानदास


**टोप्यांचे व्यापारी**

खास लग्नसराईकरितां हायक्लास रेडिमेड ब्लाऊज, फ्रॉक्स, पेटीकोट्स, बाबासूट व पंजाबी ड्रेस तयार मिळतील.

लेडीजचें शिलाईकाम वेळेवर करून मिळेल.

१७० बुधवार पेठ, पुणें २

**पेडणेकर आणि कंपनी लि.,**



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २७७३८

**बिनचूकच्या माहितीनें**

स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.

किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.

१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—

भायखळा पुल, मुंबई नं. २७.

पूना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.

—— इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत : ——

**दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.**

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, ४,६१,३०० |
| एकूण खेळतें भांडवल | ,, ५०,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.